प्रति,

जिल्हाधिकारी, सांगली,
सांगली.

क्रमांक:- पीओअेस-१०८९/१३०/स्वासैकक्ष

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १६-२-८९.

विषय:- स्वातंत्र्य सैनिकाचे पेन्शन व आर्थिक सवलती बाबत......

संदर्भ :- आपले क्र. डीसी-स्वासै. आर आर-२१-८९,
दि. १३.१.१९८९ चे पत्र पहावे.

आपण वरील विषयावरील संदर्भाधीन पत्रानुसार उपस्थित केलेल्या मुद्दांवर खालील प्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

| मुद्दा | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| १] अनेक भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांचे अर्ज अद्याप शासनाकडे प्रलंबित आहेत. त्याबाबत काय कार्यवाही झाली याची अनेक स्वातंत्र्य सैनिक सातत्याने विचारणा करीत असतात त्याबाबत योग्य तो खुलासा होणेस विनंती आहे. | ६ व्या वर्गातील प्रलंबित अर्जापैकी शासकीय निर्णयाप्रमाणे काही अर्ज मंजूर झाले आहेत. इतर अर्ज प्रलंबित आहेत. |
| २] स्वातंत्र्य सैनिकांना त्यांचे मुलाचे मुलांना शैक्षणिक सवलती देता येतील काय ? [ह्यात मुलांचे मुलाबाबत] | ह्या संबंधी शासकीय निर्णय असा आहे की स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत देण्यात येते. ज्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचा मुलगा मृत्यू पावला असेल व त्याची मुले जर स्वातंत्र्य सैनिकावर अवलंबून असतील तर त्यांना शैक्षणिक सवलत ही देय आहे मुलांच्या मुलांना नाही. |
| ३] स्वातंत्र्य सैनिकाने ह्यात असताना वैद्यकीय आर्थिक मदत घेतली असेल व त्यांच्या पत्नीने स्वत:चे आजारासाठी वैद्यकीय आर्थिक मदतीची मागणी केली असता त्यांना तशी वैद्यकीय आर्थिक मदत देता येईल काय ? | स्वातंत्र्य सैनिकाच्या मृत्यूनंतर त्याच्या पेन्शनधारक विधवेस स्वत:च्या आजारासाठी वैद्यकिय आर्थिक मदत ही शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. पीओअेस-१२८५/[२]/स्वा.सै. कक्ष, दि. २२.१.८६ अनुसार देण्यास हरकत नाही. |
| ४] स्वातंत्र्य सैनिक ह्यात असताना त्यांनी त्यांच्या पत्नीच्या आजाराकरीता आर्थिक मदतीची मागणी केली असेल तर अशा प्रकरणी त्यांच्या पत्नीस वैद्यकीय आर्थिक मदत देता येईल काय ? | स्वातंत्र्य सैनिक ह्यात असताना त्यांनी त्यांच्या पत्नीच्या आजाराकरीता आर्थिक मदतीची मागणी केली असता ती देता येत नाही. तथापि त्यांना सरकारी दवाखान्यामध्ये विनाशुल्क औषधोपचार देण्याची शासनाने सोय केलेली आहे. |

[क्र.सा.प्र.

| | |
|---|---|
| ५] स्वातंत्र्य सैनिक व त्याची पत्नी दोघेही मयत झालेले आहेत अशा परिस्थितीत त्यांच्या मुलीचे लग्नासाठी भाऊ अगर पालकांनी आर्थिक मदत मिळणेबाबत अर्ज केला तर त्यांना आर्थिक मदत देता येईल काय ? | अशा परिस्थितीत स्वातंत्र्य-सैनिकाच्या मुलीच्या पालकाचे प्रतिज्ञापत्र घ्यावे व लग्न एक महिन्याच्या अवधीत होणार अशी खात्री पटली तर आर्थिक मदत देण्यास हरकत नाही. |
| ६] स्वातंत्र्य सैनिकाचे किती मुलीचे लग्नाची आर्थिक मदत देता येते ?. | स्वातंत्र्य सैनिकाच्या प्रत्येक मुलीच्या लग्नाकरीता आर्थिक मदत देता येते. |
| ७] स्वातंत्र्य सैनिकाचे मुलीचे लग्नाचे वेळी वय हे अल्प म्हणजे १८.वर्षा-पेक्षा कमी असेल तर त्यांनी मागणी केलेल्या लग्न आर्थिक मागणीबाबत त्यांना अशी मदत देता येईल काय? | स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलीच्या लग्नाचे वय १८ पेक्षा कमी असेल तर आर्थिक मदत देऊ नये. |
| ८] स्वातंत्र्य सैनिकांनी वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेबाबत अर्ज सादर केला असेल व त्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांनी "दुर्धर रोग" असा दाखला दिला असेल व तो आजार क्षय किंवा कॅन्सर असा नसेल तर त्या अर्जास अनुसरुन वैद्यकीय आर्थिक मदत देता येईल काय ? | आर्थिक मदत देता येईल. |
| ९] स्वातंत्र्य सैनिकानी हयात असताना वैद्यकीय आर्थिक मदतीसाठी अर्ज सादर केला असेल व त्या स्वातंत्र्य सैनिकाचा वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेपूर्वीच मृत्यू झाला असेल तर त्याच्या वारसदारांना त्यांची वैद्यकिय आर्थिक मदत देता येईल काय ? | स्वातंत्र्य सैनिक वैद्यकीय आर्थिक मदत मिळण्यास शासकीय आदेशा-नुसार ती मिळण्यास पात्र असेल, तर त्याने तसा अर्ज सादर केल्यावर त्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसदारांना आर्थिक मदत देता येईल. |
| १०] वैद्यकिय आर्थिक मदत देणेबाबत कोणकोणते दुर्धर रोग ग्राह्य धरावेत. | क्षय व कॅन्सर या सारखे जे रोग दुर्धर असतील असे जिल्हा शल्य चिकित्सकाने त्यांच्या प्रमाणपत्रात प्रमाणित केले असेल तर वैद्यकिय आर्थिक मदत देण्यास हरकत नाही. |

(स्वाक्षरी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत रवाना.- सर्व जिल्हाधिकारी, [जिल्हाधिकारी, सांगली सोडून] यांना माहितीसाठी सादर अग्रेषित.